**RNI No. MAHBIL /2009/31747**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष ९, अंक ५] बुधवार, फेब्रुवारी २२, २०२३/फाल्गुन ३, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील**
**(भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त)**
**अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ फेब्रुवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

क्रमांक-मदुवआ-०६/२०२२/प्र.क्र.१००/काम-१०.—महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ ( २०१७ चा ६१ ) याच्या कलम २ च्या खंड (१०) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याच्या कलम ३४१अ अन्वये घटित केलेल्या नगरपंचायती आणि महाराष्ट्र ग्रामपंचायती अधिनियम (१९५९ चा ३) अन्वये स्थापन केलेल्या किंवा स्थापन करण्यात आल्या असल्याचे मानण्यात आलेल्या पंचायती यांना, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ याच्या प्रयोजनार्थ, स्थानिक प्राधिकरण म्हणून घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विनिता वेद सिंगल,**
शासनाच्या प्रधान सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
Dated the 22nd February 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017.

No. MSA-06/2022/C.R.100/Lab-10.— In exercise of the powers conferred by clause (10) of section 2 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), the Government of Maharashtra hereby declares *Nagar Panchayats* constituted under section 341A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 (Mah.XL of 1965) and panchayats established or deemed to have been established under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), to be the local authorities for the purpose of Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA VAID SINGAL,
Principle Secretary to Government.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ फेब्रुवारी २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

क्रमांक मदुवआ-०६/२०२२/प्र.क्र.१००/काम-१०.— महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ ( २०१७ चा महा. ६१ ) याच्या कलम २७ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास प्रदान केलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, बृहन्मुंबई महानगरपालिका, इतर सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व ग्रामपंचायती, दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ पासून, त्यांच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रांमध्ये नामफलक मराठी भाषेत असण्याशी संबंधित असणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम ३६(क) च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे कर्तव्ये पार पाडतील असे घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विनिता वेद सिंगल,**
शासनाच्या प्रधान सचिव.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 22nd February 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

No.MSA-06/2022/C.R.100/Lab-10.—In exercise of the powers conferred by section 27 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017) and of all the other powers conferred in this behalf, the Government of Maharashtra hereby declares that, the Municipal Corporation of Brihan Mumbai, all other Corporations, Municipal Councils and *Nagar Panchayats* and village panchayats shall perform the duty of enforcing the provisions of Section 36A of the said Act regarding Name Board to be in Marathi in the areas within their territorial jurisdiction with effect from the 22nd February 2023.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA VAID SINGAL,
Principle Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.